**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**

# जाहिरात

**"पर्यावरण व वातावरणीय बदल इंटरनशिप कार्यक्रम २०२४-२५"**

**दिनांक : २७ डिसेंबर, २०२४**

निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या पंचतत्वांवर पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग कार्य करीत असून, या पंचतत्वांवर आधारित घटकांमधून पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबत राज्यातील युवकांना माहिती व्हावी या उद्देशाने या विभागांतर्गत **"पर्यावरण व वातावरणीय बदल इंटरनशिप कार्यक्रम २०२४-२५"** राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत २५ उमेदवारांची इंटरन म्हणून निवड करण्यसाठी खालील अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **कार्यक्रम** | • **"पर्यावरण व वातावरणीय बदल इंटरनशिप कार्यक्रम- २०२४-२५"** |
| निवड करावयाच्या इंटरन संख्या | • **२५ (पंचवीस)** |
| राष्ट्रीयत्व | • अर्जदार भारताचा नागरीक असावा |
| शैक्षणिक अर्हता | दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यत खालील पैकी कोणत्याही शाखेतील पदवी धारण केलेली असावी (किमान ६० टक्के गुणांसह). **उच्चत्तम शैक्षणिक अर्हतेस प्राधान्य देण्यात येईल. तसेच, पर्यावरण क्षेत्रातील उच्च शैक्षणिक अर्हता असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.**<br>• Civil Engineering<br>• Electrical Engineering<br>• Mechanical Engineering<br>• Water resource Engineering / Management<br>• Environmental Engineering / Science<br>• Chemical Engineering<br>• Information and Technology<br>• Robotics/ Mechatronics<br>• Mass Communication,<br>• Graphic Designer,<br>• Web Designer<br>• Deta Analytics<br>• Botany<br>• Forestry<br>• Agriculture<br>• Economics<br>• Automobile engineering |

Mahabharti.in

| | |
|---|---|
| वयोमर्यादा | • दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी २६ वर्षांपेक्षा अधिक नसावे |
| विद्यावेतन | • रू १५,००० प्रति महिना |
| नियुक्तीचा कालावाधी | • प्रथमत: ६ महिन्यांचा असेल.<br>• ६ महिन्यांच्या कामाचे मुल्यमापन करून योग्य उमेदवारास पुढील ५ महिने मुदवाढ दिली जाईल.<br>• परंतु, एकूण ११ महिन्यांच्या कालावधीनंतर कोणासही मुदवाढ दिली जाणार नाही. |
| भाषा व संगणक ज्ञान | • मराठी भाषा लिहता, बोलता व वाचता येणे आवश्यक राहील.<br>• हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>• संगणक हाताळणी व इंटरनेटचे ज्ञान असणे आवश्यक राहील. |
| अर्ज करण्याची पध्दत | • उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचे आहेत.<br>• त्यासाठी खालील लिंक वर क्लिक करून आपला अर्ज भरावा.<br>https://bit.ly/InternsBatch2025_EnvironmentandClimateChangeDepartmentInternshipProgrammeApplicationForm<br>• सदर अर्जासोबत आपली शैक्षणीक अर्हता व वय याचे पृष्ठेत्य आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील.<br>• उमेदवारांसाठीच्या सविस्तर सूचना, अटी व शर्ती सदर लिंक मध्ये देण्यात आल्या आहेत.<br>• **ऑनलाईन अर्जा सोबत उमेदवारास ते पर्यावरण व वातावरणीय बदल विभागात काम करण्यास का इच्छुक आहेत याबाबत ५०० शब्दांचा निबंध (Statement of Purpose (SOP)) लिहून तो अपलोड करावा लागेल.**<br>• तसेच, उर्जा, विद्युत वाहने जल, उद्योग, सामाजिक माध्यमे, माझी वसुंधरा, राज्य वातावरणीय कृती कक्ष, सिया, एमसीझेडएमए, इत्यादी क्षेत्रांपैकी कोणत्या क्षेत्रात काम करण्याची आवड आहे ते नमूद करावे लागेल.<br>• **सदर ऑनलाईन फॉर्म वगळता इतर माध्यमातून केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.** |
| अर्ज करण्यासाठी मुदत | • **दिनांक २७ डिसेंबर २०२४ ते १९ जानेवारी, २०२५ या मुदतीत ऑनलाईन अर्ज करता येतील.** |
| निवडीची कार्यपध्दती | • उमेदवारांनी सादर केलेला निबंध (SOP) तपासून त्यास १०० पैकी गुण दिले जातील. यामध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे पहिल्या १०० उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड केली जाईल.<br>• या उमेदवारांची ऑनलाईन मुलाखत विभागांतर्गत गठित समिती मार्फत घेण्यात येईल.<br>• या ऑनलाईन मुलाखतीत गुणवत्ताक्रमानुसार यशस्वी ठरणाऱ्या पहिल्या **२५ (पंचवीस) उमेदवारांची "पर्यावरण व वातावरणीय बदल इंटरनशीप कार्यक्रम २०२४-२५"** साठी निवड करून नियुक्ती दिली जाईल. |

सही/-<br>
उप सचिव<br>
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

Mahabharti.in